# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.03.2026** **वारःसोमवार**

---

•चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा निवडणुकीच्या तारखा निवडणूक आयोगाकडून जाहीर

•आसाम, केरळम आणि पुद्दुचेरीमध्ये ९ एप्रिल रोजी आणि तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान तर पश्चिम बंगालमध्ये पुढील महिन्याच्या २३ आणि २९ तारखेला दोन टप्प्यात मतदान होणार

•परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर युरोपीयन युनियनच्या सदस्य देशांच्या बैठकीसाठी रवाना

आणि

•बीसीसीआयकडून रॉजर बिन्नी, राहुल द्रविड आणि मिताली राजचा सन्मान

**असेंब्ली निवडणुका**

केंद्रीय निवडणूक आयोगानं काल नवी दिल्लीत आसाम, केरलम, पुदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर केलं. आसाम, केरळम आणि पुदुच्चेरीत ९ एप्रिलला तर तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये मात्र पुढील महिन्याच्या २३ आणि २९ तारखेला दोन टप्प्यात मतदान होईल. निवडणूक होत असलेल्या या चार राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात आता आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे. या शिवाय निवडणूक आयोगानं सहा राज्यांतील आठ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर केला आहे.

यामध्ये महाराष्ट्रातील राहुरी आणि बारामती या दोन विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या दोन्ही पोटनिवडणुकांसाठी २३ एप्रिलला मतदान होईल.
या सर्व ठिकाणी 4 मे रोजी मतमोजणी होणार आहे. माजी उपमुख्यमंत्री आणि बारामती मतदारसंघाचे आमदार अजित पवार, तसंच राहुरी मतदारसंघाचे
आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्यानं ही पोटनिवडणूक होत आहे.

गोव्यातील फोंडा, गुजरातमधील उमरेथ, कर्नाटकातील बागलकोट आणि दक्षिण दावणगेरे, नागालँडमधील कोरीडांग आणि त्रिपुरातील धर्मनगर या जागांसाठीही पोटनिवडणूक होणार आहे. गोवा, कर्नाटक, नागालँड आणि त्रिपुरा येथील पोटनिवडणुकीची अधिसूचना आज जारी करण्यात येईल आणि ९ एप्रिल रोजी मतदान

होईल. गुजरात आणि महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीची अधिसूचना या महिन्याच्या ३० तारखेला जारी केली जाईल.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर युरोपियन युनियनच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा करण्यासाठी ब्रुसेल्समध्ये पोहोचले. दोन दिवसांच्या या दौऱ्यात, परराष्ट्र व्यवहार परिषदेच्या बैठकीत युरोपियन युनियनच्या २७ सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी जयशंकर संवाद साधणार आहेत. ते युरोपियन युनियनच्या नेतृत्वाबरोबर आणि बेल्जियम आणि इतर सदस्य देशांमधील त्यांच्या समकक्षांबरोबर बैठका घेतील असं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं आहे. डॉक्टर जयशंकर यांच्या भेटीमुळे युरोपियन युनियनसोबत भारताची धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ होण्यास मदत होईल.

**<u>गडकरी</u>**

नागरिकांनी विशेषतः तरुणांनी वाहतूक नियमांचं काटेकोरपणे पालन करावं आणि वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेवावं असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. वाहने चालवताना शिस्त आवश्यक असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्रातील नागपूर इथं सिम्बायोसिस महाविद्यालयात रस्ते सुरक्षा अभियान कार्यक्रमात गडकरी यांनी काल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दरवर्षी सुमारे ५० हजार मृत्यू हेल्मेट न घातल्यामुळे होतात, तर २६ हजार मृत्यू सीटबेल्ट न वापरल्याने होतात असं त्यांनी नमूद केलं.

**<u>तेलंगणा</u>**

तेलंगणा विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. या बैठकीच्या पूर्वतयारीसाठी काल एक बैठक आयोजित करण्यात आली होती. सभापती गद्दम प्रसाद कुमार आणि विधान परिषदेचे अध्यक्ष गुट्टा सुखेंदर रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला मंत्री, वरिष्ठ अधिकारी आणि पोलिस अधिकारी उपस्थित होते.

**<u>पद्मपुरस्कार</u>**

2027 या वर्षासाठीच्या पद्म पुरस्कारांकरता सरकारनं नामांकने आणि शिफारसी मागवल्या आहेत. नामांकने पाठवण्याची अंतिम तारीख ३१ जुलै आहे. पद्म पुरस्कारांसाठी नामांकने आणि शिफारसी केवळ राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलद्वारे ऑनलाइन स्वीकारल्या जाणार आहेत. या पुरस्कारांसाठी वंश, व्यवसाय, पद किंवा लिंगाचा भेद नसेल. देसातील सर्व नागरिक या पुरस्कारांसाठी पात्र आहेत असं गृह मंत्रालयानं म्हटलं आहे.

डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता सार्वजनिक उपक्रमांमध्ये काम करणारे सरकारी कर्मचारी पद्म पुरस्कारांसाठी पात्र असणार नाहीत. सर्व नागरिकांना स्व-नामांकनासह नामांकनं किंवा शिफारसी करण्याची विनंती मंत्रालयानं केली आहे. १९५४ साली सुरू करण्यात आलेले पद्म पुरस्कार - पद्म विभूषण, पद्म भूषण आणि पद्मश्री हे देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक आहेत.

**इराण-परराष्ट्रमंत्री**

अमेरिका आणि इस्रायली सैन्यानं इराणवर मोठ्या प्रमाणात हल्ले केल्यानं  पश्चिम आशियातील संघर्ष आता तीव्र झाला आहे. इराणमधील इस्फहान या औद्योगिक शहरावर अनेक हल्ले झाले असून एका कारखान्यातील किमान १५ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. संयुक्त अरब अमिरातीला  देखील या संघर्षाची झळ बसत आहे. ऊर्जा आणि बंदरांच्या कामकाजावर अमिराती  बारकाईनं लक्ष ठेवून आहे. दरम्यान, अबूधाबीमधील भारतीय दूतावासानं दुबई, शारजाह आणि अबू धाबी इथून विमान उड्डाण वेळापत्रकाबाबत अद्ययावत सूचना जारी केल्या आहेत. पुढील दोन दिवसांत, कतार एअरवेज ही विमान कंपनी नवी दिल्ली, मुंबई आणि कोचीसाठी उड्डाणे सुरू करणार आहे अशी माहिती दोहा इथल्या भारतीय दूतावासानं दिली आहे.

अमेरिकेशी चर्चा करण्याबाबत कोणतेही कारण इराणला दिसत नाही,असं मत इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरागची यांनी व्यक्त केलं  आहे. ते काल अमेरिकन प्रसारमाध्यमांना दिलेल्या एका मुलाखतीत बोलत  होते.
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी,"इराणशी कोणताही करार करण्यास अमेरिका अद्याप तयार नाही, कारण कराराच्या अटी पुरेशा समाधानकारक नाहीत," असे विधान केल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी अरागची यांची ही प्रतिक्रिया समोर आली आहे.

जोपर्यंत अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना ही जाणीव होत नाही की, त्यांनी अमेरिकन आणि इराणी या दोन्ही जनतेवर जे बेकायदेशीर युद्ध लादलं आहे, ते चुकीचे आहे आणि त्याची पुनरावृत्ती पुन्हा कधीही होता कामा नये; तोपर्यंत इराणचं सशस्त्र दल आपला हल्ला सुरूच ठेवेल. तसंच या युद्धातल्या पीडितांना योग्य ती नुकसानभरपाई देखील मिळाली पाहिजे, असंही  इराणच्या परराष्ट्र  मंत्र्यांनी  प्रसारमाध्यमांना दिलेल्या मुलाखतीत नमूद केलं.

**बीसीसीआय-पुरस्कार**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ – बीसीसीआयचा नमन पुरस्कार सोहळा काल नवी दिल्लीत पार पडला. दिग्गज खेळाडू रॉजर बिन्नी आणि राहुल द्रविड यांना, कर्नल सी. के. नायडू जीवनगौरव पुरस्कारानं, तर महिला क्रिकेट संघाची माजी
कर्णधार मिताली राज हिला महिला जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. २०२४-२५ या क्रिकेट हंगामात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय खेळाडू म्हणून शुभमन गिल आणि स्मृती मानधना यांना, तर सर्वोत्कृष्ट देशांतर्गत खेळाडू म्हणून आयुष म्हात्रे आणि इरा जाधव यांना गौरवण्यात आलं. देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांच्या आयोजनासाठीचा पुरस्कार मुंबई क्रिकेट संघटनेला देण्यात आला.

**<u>बॉक्सिंग</u>**

बँकॉकमध्ये झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स करंडक स्पर्धेत भारतानं पाच पदकांची कामगिरी केली आहे. यामध्ये एक सुवर्ण, तीन रौप्य आणि एका  कांस्यपदकाचा समावेश आहे. कालच्या शेवटच्या दिवशी, महिलांच्या ५१ किलो गटात चंद्रिका पुजारीने उझबेकिस्तानच्या मार्डोनोव्हा नाझोकतला ५-शून्यनं पराभूत करत  सुवर्णपदक जिंकलं.

**<u>ओडिशा-पूल</u>**

ओडिशातल्या मयूरभंज जिल्हयातील किमान बारा गावांना काल वादळाचा जोरदार तडाखा बसला. यामुळं दोन व्यक्तींचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. वादळामुळं अनेक झाडं आणि विजेचे खांब उन्मळून पडले असून दोनशेहून अधिक घरांचे नुकसान झालं आहे. राज्य सरकारनं मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी चार लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे. हिमाचल प्रदेशात काल दुपारी काही ठिकाणी गारपीट आणि पाऊस झाला तर गेल्या २४ तासांत, हिमवृष्टी झाल्याचंही वृत्त आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं  बिहार, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालचा काही भाग, झारखंड, ओडिशा आणि उत्तराखंडमध्ये काही ठिकाणी वादळासह गारपीटीचा नारिंगी बावटा जारी केला आहे तर उद्यापर्यंत अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे.

पुढील दोन ते तीन दिवसांत बिहार, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, ओडिशा, पश्चिम बंगालचा काही भाग, उत्तर प्रदेश आणि ईशान्येकडील  भागात विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळाचा इशारा देण्यात आला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं**

**नमस्कार.**